# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## Savitribai Phule Pune University
Formerly Pune University

| | |
|---|---|
| अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष | Internal Quality Assurance Cell |
| गणेशखिंड, पुणे–४११००७ | Ganeshkhind, Pune – 411007 |
| दूरध्वनी क्रमांक: ०२०–२५६२१०४४/८/९/५१ | Contact No. 020-25621044/8/9/51 |
| ई–मेल : iqac@unipune.ac.in | E-mail - iqac@unipune.ac.in |
| संकेतस्थळ - www.unipune.ac.in | Website – www.unipune.ac.in |


अंगुहक/३१०/२०२५ दिनांक : १९/०७/२०२५

**अत्यंत महत्त्वाचे व तातडीचे**

**प्रति,**

**मा. विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक/**
**सर्व सलंग्नित/स्वायत्त महाविद्यालये/**
**मान्यताप्राप्त परिसंस्था**
**प्रस्तुत विद्यापीठ**

**विषय : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत असलेले विद्यापीठ विभाग व पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्हयातील सर्व सलंग्नित/स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संशोधन समन्वयक (ARC) यांचेकरीता गुरूवार, दिनांक ३१ जुलै, २०२५ रोजी होणाऱ्या एकदिवसीय कार्यशाळेबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत असलेले विद्यापीठ विभाग/संलग्नित/स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांना आविष्कार संशोधन स्पर्धा, अन्वेषन संशोधन स्पर्धा व इतर संशोधन योजनांची जलद व प्रभावीपणे अंमलबजावणीच्या अनुषंगाने सुयोग्य नियोजन करुन ते यशस्वी होण्यासाठी आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विद्यापीठ विभाग/संलग्नित/स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संशोधन समन्वयक (ARC) यांचेकरीता **गुरूवार दिनांक ३१ जुलै, २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता इरावती कर्वे सभागृह** येथे एकदिवसीय कार्यशाळेचे नियोजन करण्याचे योजले आहे.

सदर कार्यशाळेमध्ये मा. कुलगुरू, आविष्कार समितीचे अध्यक्ष व सभासद तसेच विषयतज्ञ व संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार असून सर्व विद्यापीठ विभाग/संलग्नित/स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संशोधन समन्वयक (ARC) यांच्या मनातील शंकाचे निरसन सविस्तरपणे करणार आहेत. सदर कार्यशाळा आविष्कार व अन्वेषन संशोधन स्पर्धा व इतर संशोधन योजना याविषयी विद्यापीठ विभाग/संलग्नित/स्वायत्त महाविद्यालये/परिसंस्था स्तरावर कोणताही संभ्रम राहू नये यासाठी मार्गदर्शन करणार आहेत. तरी सदरील कार्यशाळेस मोठया संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ ध्यावा.

***सदरील कार्यशाळेकरीता उपस्थित राहणाऱ्या मा. संशोधन समन्वयक (ARC) यांना विद्यापीठामार्फत/विभागामार्फत कोणतेही TA/DA अथवा मानधन दिले जाणार नाही. कृपया सर्वांनी याची नोंद घ्यावी.**

कळावे,

आपला,

प्रा. डॉ. विनायक जोशी
संचालक
अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे ४११००७